### विभागीय, जिल्हास्तरावरील मेळाव्यासाठी ५ लाखांपर्यंत मर्यादा

# रोजगार मेळाव्यांसाठी भरीव तरतूद

## कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांची माहिती



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यातील उद्योग, कारखाने, खाजगी आस्थापना, कॉर्पोरेट संस्था यामधील रोजगार भरतीसाठी कौशल्य विकास विभागामार्फत वेळोवेळी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. या मेळाव्यांच्या आयोजनासाठी आता भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली असून विभागीय तसेच जिल्हास्तरावरील प्रत्येक मेळाव्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.



### ३ कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद

या उपक्रमासाठी ३ कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद केली असून आतापर्यंत १ कोटी ५१ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत, अशी माहितीही मंत्री लोढा यांनी दिली.

### प्रचार, प्रसिद्धीसाठी १ लाख रुपये

- राज्यात ठिकठिकाणी रोजगार मेळाव्यांचे प्रभावीपणे आयोजन करून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने पुढाकार घेतला आहे.
- महास्वयम वेबपोर्टल मार्फतही बेरोजगार उमेदवारांना कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. आतापर्यंत विभागीय स्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी १ लाख रुपये तर जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा होती.
- आता ही मर्यादा विभागीय आणि जिल्हास्तरावरील कोणत्याही मेळाव्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे रोजगार मेळावे प्रभावीपणे आयोजित करणे सुलभ होणार आहे.
- रोजगार मेळाव्याची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावी यासाठी १ लाख रुपये इतकी रक्कम मेळाव्याच्या प्रचार व प्रसिद्धीवर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे, असे लोढा यांनी सांगितले. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

### बेरोजगारांना रोजगार...




राज्यातील बेरोजगारांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने विविध उद्योग, आस्थापना यांच्याकडून रिक्त पदे अधिसूचित करून घेऊन हे मेळावे आयोजित करण्यात येतात. विविध शासकीय महामंडळे, राष्ट्रीयकृत तसेच खाजगी बँका, वित्तीय संस्था यांना तसेच कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार राबविणारे इतर शासकीय विभाग यांना मेळाव्यात आमंत्रित करणे, उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्यविषयक प्रशिक्षणाची माहिती देणे, भविष्यात उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधी, यासाठी राज्यातील रोजगार मेळाव्यांचे अधिक प्रभावीपणे आयोजन करणे आवश्यक आहे. यासाठी होणारा खर्च लक्षात घेता मेळाव्यांच्या आयोजनासाठी खर्च मर्यादेत भरीव वाढ करण्यात आली आहे.

# जनतेचे दु:ख समजून घेण्यासाठी आलो

## राहुल गांधींनी नांदेडमध्ये साधला संवाद

**नांदेड,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कन्याकुमारी ते काश्मीर पर्यंत सुरु असलेल्या भारत जोडो यात्रेचा उद्देश देश जोडण्याचा आहे. देशात सध्या द्वेष पसरवण्याचे काम केले जात आहे. या भारत तोडोच्या विरोधात भारत जोडो यात्रा आहे. ही पदयात्रा काश्मीरपर्यंत कोणीही रोखू शकत नाही. या पदयात्रेदरम्यान पुढील १४ दिवस महाराष्ट्रातील जनतेचे दुःख समजून घेण्यासाठी आलो आहोत, असे खासदार राहुल गांधी म्हणाले. हजारो मशाल हाती घेऊन राहुल गांधी यांच्यासह भारतयात्री सोमवारी रात्री तेलंगणातून महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे प्रवेश केला. तेलंगणातून महाराष्ट्रात पदयात्रा येताच तेलंगणा प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष रेवंत रेड्डी यांनी तिरंगा झेंडा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हाती सोपवला. यावेळी राहुल गांधी यांचे मराठमोळ्या पद्धतीने औक्षण केले.



### चार-पाच भांडवलदारासाठी सरकार काम करते

राहुल गांधी पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील पदयात्रेची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून करत आहे ही अभिमानाची बाब आहे. देशात आज ज्वलंत समस्या आहेत पण केंद्र सरकार त्याकडे लक्ष देत नाही, केवळ चार पाच भांडवलदारांसाठी हे सरकार काम करत आहे. नोटबंदीने देशातील छोटे व्यवसाय डबघाईला आले. ४०० रुपयांचा सिलिंडर ११०० रुपये झाला, पेट्रोल, डिझेल १०० रुपये लिटर झाला पण पंतप्रधान मोदी त्यावर एक चकार शब्दही बोलत नाहीत.

## # QUICK NEWS

### हेल्मेट न देणाऱ्यांवर कारवाई करा

**पुणे :** ग्राहकाने दुचाकी खरेदी केल्यानंतर त्यांना हेल्मेट न देणाऱ्या शहरातील वाहन वितरकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी अपना वतन संघटनेने परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी-चिंचवड व शहर पोलिस आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. चालू वर्षात पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर सर्वच कंपन्यांच्या दुचाकींची विक्री मोठ्या प्रमाणात झालेली आहे. केंद्रीय मोटार वाहन अधिनियमानुसार दुचाकी वितरकांनी ग्राहकाला हेल्मेट देणे बंधनकारक आहे. रस्त्यावर होणारे अपघात टाळण्यासाठी दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा यासाठी दुचाकीची विक्री करतानाच खरेदीदाराला दोन हेल्मेट देण्याचा नियम आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल घोषित

**मुंबई :** गमहाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ३१ जुलै रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल सोमवारी सायं. ६ वाजता www.mscepune.in व https://www.mscepuppss.in या परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात आला आहे.

### वादग्रस्त अधिकारी • संस्थाचालकाकडून लाच घेतल्याचा आरोप

# सोलापूरचे शिक्षणाधिकारी किरण लोहार निलंबित

**सोलापूर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. संस्थाचालकाकडून लाच घेतल्याप्रकरणी अटकेत असलेले सोलापूर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना अखेर सोमवारी निलंबित करण्यात आले. ३१ ऑक्टोबर रोजी २५ हजार रूपयांची लाच घेताना किरण लोहार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते.

३ नोव्हेंबर रोजी लाचलुचपत विभागाकडून अहवाल प्राप्त होताच तातडीने जिल्हा परिषद प्रशासनाने अवर सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई, आयुक्त शिक्षण विभाग पुणे व संचालक शिक्षण विभाग पुणे या कार्यालयांना शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्यावर पुढील प्रशासकीय कारवाईसाठी अहवाल पाठवला होता. त्यानुसार राज्य शासनाच्या आदेशानुसार शिक्षणाधिकारी लोहार यांना निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, शिक्षणाधिकारी किरण लोहार यांची कारकिर्द ही नेहमीच वादग्रस्त राहिली आहे. ते ज्या ठिकाणी जातात तेथे वादांची मालिका सुरू होते.

### मुख्यालय सोडता येणार नाही



निलंबन आदेशानुसार किरण लोहार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (गट-अ), जि.प.सोलापूर यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे आणि पुढील आदेश होईपर्यंत ते निलंबित राहतील. त्याचप्रमाणे निलंबन कालावधीत लोहार यांचे मुख्यालय सोलापूर ठेवण्यात आले असून त्यांना या कालावधीत मुख्यालय सोडता येणार नाही असेही निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### जामीन मंजूर

शिक्षणाधिकारी लोहार सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे. या अर्जावर सोमवारी युक्तिवाद झाला. आरोपी लोहार यांच्यातर्फे अँड. मिलिंद थोबडे, विनोद सूर्यवंशी यांनी युक्तिवाद केला आहे. पोलीस तपास संपला आहे, त्यामुळे आता त्यांना जामीन द्यावा अशी मागणी केली. सरकारतर्फे आरोपी साक्षीदारावर दबाव आणण्याची शक्यता असल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी लोहार यांना २० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

### शासकीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा

**अकोला,** (वा.) स्थानिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) व सर्वोपचार रुग्णालयातील शासकीय रक्तपेढीमध्ये गत काही दिवसांपासून रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे आपात्कालीन, दुर्घटनाग्रस्त व गर्भवती महिलांसह सिकलसेल व थॅलिसिमीयाग्रस्त बालकांना रक्त देण्यास विलंब होत आहे. रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी रक्तदात्यांनी रक्तदान करण्याचे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढीतून महिन्याला सुमारे १२०० रक्त पिशव्या रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येतात, तर दिवसाला सरासरी ४० रक्तपिशव्यांची आवश्यकता असते. परंतु सध्या रक्तपेढीत रक्ताचा साठा नगण्य असल्याने व मागणी सतत होत असल्याने रक्तपेढीत कार्यरत कर्मचाऱ्यांसह इतरांना रुग्णांना रक्त देण्यास अडचणी येत आहेत.

# नाट्यसंस्थांसाठी दोन ऑनलाइन केंद्रे

## सांस्कृतिक कार्यमंत्री मुनगंटीवार यांची माहिती

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्राबाहेरील आणि देशाबाहेरील नाट्यसंस्थांना हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी होता यावे, यासाठी दोन स्वतंत्र ऑनलाइन केंद्रे सुरू करण्यात येतील,अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. ५९ व्या राज्य हौशी नाट्य स्पर्धेच्या गोवा येथे रविवारी आयोजित पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नाट्य कलाकार विजय गोखले, सांस्कृतिक विभागाचे उपसचिव विलास थोरात, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे मंचावर उपस्थित होते.



### नाट्यविषयक प्रशिक्षणाची संख्या १२

राज्यात यापूर्वी दोन नाट्यविषयक प्रशिक्षणे आयोजित केली जात होती, त्यांची संख्या आता १२ करण्यात येत असल्याची घोषणा मंत्री मुनगंटीवार यांनी केली. बालनाट्य स्पर्धेची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी धोरण निश्चित करणे, राज्य नाट्यस्पर्धेतील पारितोषिक रक्कम वाढविणे, परीक्षकांचे मानधन वाढविणे यांचाही प्राधान्याने विचार करणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले.

### बोलीभाषेतील एकांकिका सुरू करणार



समाज आणि देशाला दिशा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या महामानवांवर महानाट्ये करण्याचे विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले. यंदाच्या वर्षापासून राज्यातील स्थानिक बोलीभाषेतील एकांकिका स्पर्धा व महोत्सव सुरू करण्याचा मानसही मुनगंटीवार यांनी जाहीर केला.

# साताऱ्यात सत्तार यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला

## महिला कार्यकर्त्यांचे पुतळ्यास जोडे

**सातारा,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांना शिवीगाळ केल्याचे तीव्र पडसाद साताऱ्यात उमटले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, युवकचे जिल्हाध्यक्ष तेजस शिंदे यांनी पदाधिकाऱ्यांना बोलावून सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास मंत्री अब्दूल सत्तार यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास महिलांनी जोडे मारुन खाली तुडवत पेटवून दिला. यावेळी कार्यकर्त्यांनी निम का पत्ता कडवा है..अब्दूल सत्तार भडवा है, सुप्रियाताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत निषेध केला.



### कार्यालयात एकत्र

सुप्रिया सुळे यांना मंत्री सत्तार यांनी शिवीगाळ केल्याचे समजताच सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठांकडून सूचना मिळताच राष्ट्रवादी कार्यालयात सायंकाळी सहा वाजता सर्व पदाधिकारी एकत्र आले. त्यामध्ये राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, युवकचे जिल्हाध्यक्ष तेजस शिंदे, महिला जिल्हाध्यक्ष संमिद्रा जाधव, स्मिता देशमुख, पूजा काळे, विद्यार्थी सेलचे अतुल शिंदे, गोरखनाथ नलावडे, सनी शिर्के, अजित बर्गे, सागर कुंभार, सागर पवार, सचिन जाधव, प्रथमेश पवार, विकी भंडलकर, शंकर जगताप यांच्यासह पदाधिकारी यांनी एकत्र येवून जोरदार घोषणा देत प्रतिकात्मक सत्तार यांच्या पुतळ्यास जोडे मारत पेटवून निषेध नोंदवला.

### जशास तसे उत्तर देऊ

तेजस शिंदे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्यावर खालच्या पद्धतीवर जावून टीका करणे आणि शिवीगाळ करणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. त्यांच्या नेत्यांनी त्यांना काय शिकवले आहे काय?, ते कोणत्या संस्कृतीतून येते हे स्पष्ट दिसून येते. त्यांनी ताबडतोब माफी मागावी, परत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्याबाबत टीका केली तर जशास तसे उत्तर देवू असा इशारा दिला.

# ५०० रुपयांसाठी दोघांची हत्या

**औरंगाबाद,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. घाटी रुग्णालयाच्या परिसरात सोमवारी रस्त्याच्या कडेला राहणाऱ्या दोघांची हत्या केल्याची घटना समोर आली होती. याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ तपासाचे चक्र फिरवत खून करणाऱ्या आरोपीला अखेर बेड्या ठोकल्या आहे. विशेष म्हणजे अवघ्या पाचशे रुपयांच्या वादावरून झालेल्या वादातून आरोपीने खून केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. नागेश्वर शिवलिंगअप्पा घुसे (५०, रा. कोहिनूर कॉलनी, मोगलपुरा ) आणि संग्राम रंकट (७०) अशी मृतांची नावे आहेत. तर शेख वजीर शेख बशीर (वय ३२ वर्षे, रा. कोहिनूर कॉलनी) असे आरोपीचे नाव आहे. संग्राम रंकट हे घाटी परिसरातील रस्त्याच्या कडूयाला फूटपाथवर एका झोपडीत राहत होते. दरम्यान, नागेश्वर घुसे हे नियमित संग्राम रंकट यांच्याकडे यायचे. त्यामुळे त्यांची ओळख होती. आरोपी वजीरही अधूनमधून तेथे यायचा. रविवारी रात्री ते तिघे तेथे होते. दरम्यान त्यांच्यात पाचशे रुपयांवरून वाद झाला. वाद एवढ्या विकोपाला गेला की, वजीरने दगड उचलून नागेश्वर यांच्या डोक्यात घातला. ज्यात नागेश्वर यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर वजीरने संग्राम यांचा गळा आवळला आणि त्यांची देखील हत्या केली. दोघांना संपविल्यानंतर तो तेथून निघून गेला.

# आजची मुले आई-वडिलांवर अवलंबून : सुधा मूर्ती

## २३ पुस्तक संचाचे प्रकाशन

**सांगली,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. माझे लेखन हे कन्नड भाषेत झाले असले तरी माझे हृदय हे मराठीच आहे. वाचकांच्या मनातील अनुभव साहित्यातून मांडल्याने माझे साहित्य वाचकांना आपलेसे वाटले, असे मत प्रख्यात लेखिका सुधा मूर्ती यांनी व्यक्त केले. आजची मुले ही आई-वडिलांवर अवलंबून आहेत हे बरोबर नाही. आई-वडिलांनी एका मर्यादेपर्यंतच मदत करावी, नंतर हस्तक्षेप थांबवावा, याकडे मूर्ती यांनी लक्ष वेधत लोकांनी सोशल मीडियावर वेळ घालवण्यापेक्षा वाचन करा, लिहिते व्हा, असे आवाहनही त्यांनी वाचकांना केले. यावेळी मेहता प्रकाशनच्यावतीने सुधा मूर्ती यांच्या २३ नवीन पुस्तक संचाचे प्रकाशन करण्यात आले. भावे नाट्यमंदिर वाचकांच्या गर्दीने हाऊसफुल्लं झाले होते. अनुवादिका लीना सोहोनी यांनी मूर्ती यांची मुलाखत घेतली.

आजच्या पिढीबद्दल बोलताना मूर्ती म्हणाल्या, पालकांनी मुलांना कष्ट नकोत म्हणून घरी बांधून ठेऊ नका. मानसिकदृष्ट्या सक्षम करा, शंभरपैकी शंभर गुण मिळवायला मुले सुपरमॅन आहेत का ? आज मुले ही आई-वडिलांवर शंभर टक्के अवलंबून आहेत हे बरोबर नाही. आई-वडिलांनी एका मर्यादेपर्यंतच मदत करावी, नंतर हस्तक्षेप थांबवावा.




### ३ रुपये मिळाले तेव्हा ३ कोटी मिळाल्याचा आनंद

1 स्वत:च्या लेखन प्रवासाविषयी बोलताना सुधा मूर्ती म्हणाल्या, पैशाने श्रीमंत नसलेल्या मध्यमवर्गीय घरात आई- वडील, आजोबा यांच्या संस्कारात वाढले. त्या काळात सुटीच्या दिवशी देऊळ, वनविहार ही फिरण्याची ठिकाणे. आजोबा सुटीच्या दिवशी फिरायला घेऊन जायचे आणि यावर पंचवीस ओळी लिहायला लावायचे. आठ-नऊ वर्षांची असताना लिहायला सुरुवात केली. १९६४ मध्ये ३ रुपये मिळाले तेव्हा ३ कोटी मिळाल्याचा आनंद झाला. इंजिनिअर झाले, लोकांना भेटले, अनेक देश फिरले.

2 समाजातील सुख-दु:खाचा कॅनव्हास मांडला, तेव्हा जीवन म्हणजे काय हे कळले. १९८० मध्ये माझे कन्नड भाषेत पहिले पुस्तक आले. १६ वर्षांत एक पॅरा इंग्रजीत लिहिला नसतानाही मी इंजिनिअर झाले, इंग्रजी वृत्तपत्र वाचायला सुरुवात केली. कन्नड ही माझी मातृभाषा असताना वयाच्या ५२ व्या वर्षी इंग्रजी भाषेत पहिले पुस्तक लिहिले. वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत लिहिते आहे, लवकरच आणखी काही पुस्तके प्रकाशित होत आहेत. मी आनंदासाठी लिहिते, नाटक, सिनेमासाठी लिहित नाही, असेही मूर्ती म्हणाल्या.

### वैशिष्ट्यपूर्ण वास्तुशैलीचा नमुना • अडथळे दूर: मंदिराच्या नैसर्गिक संवर्धनाचे काम

# अंबाबाई मंदिरात किरणोत्सव सुरू

**कोल्हापूर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात आजपासून किरणोत्सवाला प्रारंभ होणार आहे. हा सोहळा पुढील पाच दिवस असेल. दरम्यान, देवीच्या किरणोत्सव सोहळ्यात अडथळे येऊ नयेत, यासाठी ते दूर करण्यात आले आहेत. मंदिरात पारंपरिक उत्साहात दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यामुळे आकर्षक रोषणाईसह पणत्यांनी मंदिर परिसर उजळून गेला. वैशिष्ट्यपूर्ण वास्तूशैलीचा नमुना अशी या किरणोत्सवाची ओळख आहे.

दीपोत्सवानिमित्त पंचगंगा नदी घाट येथे राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या माजी खजानीस वैशाली क्षीरसागर यांच्या हस्ते पंचगंगा नदीची आरती करण्यात आली. यावेळी महाप्रसादाचे वाटप झाले.



### १२ व्या शतकातील यादवकालीन संस्कृत शिलालेख

दरम्यान,अंबाबाई मंदिराचे नैसर्गिक संवर्धन करण्यासाठी संगमरवर काढण्याचे काम सुरु आहे. यावेळी सापडलेल्या एका शिलालेखाने मंदिराचा समृद्ध वारसा किती प्रचंड आहे याबाबत पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. हे काम सुरु असतानाच १२ व्या शतकातील शिलालेख सापडला आहे. मुख्य मंदिरातील सरस्वती मंदिराच्या पूर्वेकडील भिंतीवरील संगमरवर काढण्यात आल्यावर २ बाय १ फूट दगडी शिलालेख सापडला आहे. दगडी भिंतीवर कोरलेल्या १२व्या शतकातील संस्कृतमधील शिलालेखाने प्रकाश टाकला गेला आहे.

### १६ ओळींमध्ये म्हणी कोरल्या आहेत

भिंतीवर आडव्या पद्धतीने शिलालेख आहे. त्यावर १६ ओळींमध्ये गड्डेगली ( म्हणी) कोरल्या आहेत. मराठीमध्ये गड्डेगली किंवा कन्नडमधील गड्डेगालू ही स्थानिक संस्कृती आणि अनुभवांवर आधारित म्हणी आहेत. ताजा शिलालेख हा १२ व्या शतकातील यादवकालीन शिलालेख आहे. यावरूनच मंदिराचा वारसा किती समृद्ध आहे याची माहिती मिळते. यापूर्वी मंदिराच्या आवारात नवग्रह मंदिराच्या खांबांवर दगडी शिलालेख सापडले होते.

# 'नोटबंदीचा दुखवटा अजून सरला नाही'

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. आजच्या दिवशी २०१६ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी जाहीर करून देशातील स्थिर अर्थकारणाची हत्या केली. आज सहा वर्ष सरली तरी दुखवटा मात्र सरला नाही. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेस 'नोटाबंदीला श्रद्धांजली' वाहण्याचे राज्यव्यापी आंदोलन करणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ट्वीट करत दिली आहे.लोकांचे दरडोई उत्पन्न जे २०१६-१७ मध्ये ८.२ टक्के होते ते २०२०-२१ मध्ये -७.३ टक्के झाले आहे. नोटबंदीमुळे सुमारे ३ कोटी लोकांनी आपली नोकरी गमावली, असे पाटील म्हणाले.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

**ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**
सीआयएन : यु ६७१०० टीझेड २०१४ पीटीसी ०२०३६३
नोंदणीकृत कार्यालय ९, एमपी नगर, १ ला रस्ता, कोंगू नगर एक्स्टेंशन, त्रिपूर - ६४१ ६०७
कॉर्पोरेट कार्यालय : सी / ५१५, कानकिया झिल्लीअन, एलबीएस रोड आणि सीएसटी रोड जंक्शन, बीकेसी अनेक्स इक्विनॉक्स जवळ, कुर्ला [पश्चिम ] मुंबई ४०० ०७०
संकेतस्थळ : www.omkaraarc.com मोबाईल : ९७७३४०६१७५

[परिशिष्ट - ४ ए ] [पहा प्रोव्हीजो नियम ८ [६] आर / डब्ल्यू ९[१]] | अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट [इन्फोर्समेंट ] नियम २००२ चा नियम ८[६] च्या तरतुदी यांच्या अनुसार अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी इ लिलाव विक्री सूचना**
याद्वारे आम जनता आणि कर्जदार विशेषत: मेसर्स प्रणिता इंटरप्रायझेस आणि सह कर्जदार खर्डे नीता परेश आणि श्री परेश मधुकर खर्डे आणि ओम डिस्ट्रिब्युटर्स आणि श्रीमती मीना किरण खर्डे यांना याद्वारे सूचित करण्यात येते की खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या अचल मालमत्ता संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत किंवा त्यांचा सदरील मालमत्तांवर भार आहे. आणि सदरील मालमत्तांचा ताबा ओमकारा एआरसी संरक्षित धनको यांचे प्राधीकृत अधिकारी यांनी घेतला आहे, त्या मालमत्तांची विक्री "जसे आहे, जिथे आहे", "जे आहे, ते आहे", "आहे तसे आहे" आणि विदाउट रिकोर्स तत्वावर **१३/१२/२०२२ रोजी सकाळी ११. ०० वाजता [बोली सादर करण्याची वेळ १२/१२/२०२२ संध्याकाळी ६. ०० वाजता ]** रु २,११,७६,४९९. २५ **[रुपये दोन कोटी अकरा लाख शहात्तर हजार चारशे नव्याण्णव पैसे पंचवीस मात्र ] जे ३ नोव्हेंबर २०२२** रोजी थकीत आहेत आदिक त्यावरील व्याज /न आकारलेले व्याज विहित दराने आणि आकस्मिक खर्च, शुल्क आणि आकार यांच्या वसुलीसाठी करण्यात येणार आहे.
मेसर्स ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड संरक्षित धनको यांना सदरील रक्कम वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार यांच्याकडून येणे आहे. **द ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड [ जे ओमकारा पीएस ०४/ २०२०- २१ ट्रस्ट यांचे ट्रस्टी म्हणून कार्यरत आहेत ]** यांनी वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार यांच्याकडून येणे असलेल्या रकमेचे संपादन अधिकार असाइनमेंट ॲग्रीमेंट दिनांकीत १५-०६-२०२० प्रमाणे तसेच खालील प्रमाणे नमूद केलेल्या प्रतिभूती एडेलवाईज हौसिंग फिनान्स लिमिटेड यांच्याकडून संपादित केल्या आहेत. अचल मालमत्तांचा तपशील, राखीव किंमत, आणि ईएमडी रक्कम तसेच ज्ञात असलेले भार [असल्यास] खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार आहेत.

| मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत | ईएमडी |
|---|---|---|
| **कार्यालय क्रमांक १४,** सिटी आर्केड, प्लॉट क्रमांक ४ आणि ५ शिवाजी नगर, जेल रोड, वॉटर टँक समोर, नाशिक रोड दासक शिवार | रु ९,५०,००० /- | रु ९५,००० /- |
| **कार्यालय क्रमांक १६,** सिटी आर्केड, प्लॉट क्रमांक ४ आणि ५ शिवाजी नगर, जेल रोड, वॉटर टँक समोर, नाशिक रोड दासक शिवार | रु ९,५०,००० /- | रु ९५,००० /- |
| **कार्यालय क्रमांक १७,** सिटी आर्केड, प्लॉट क्रमांक ४ आणि ५ शिवाजी नगर, जेल रोड, वॉटर टँक समोर, नाशिक रोड दासक शिवार | रु ९,५०,००० /- | रु ९५,००० /- |
| **कार्यालय क्रमांक २१,** सिटी आर्केड, प्लॉट क्रमांक ४ आणि ५ शिवाजी नगर, जेल रोड, वॉटर टँक समोर, नाशिक रोड दासक शिवार | रु ९,५०,००० /- | रु ९५,००० /- |
| **कार्यालय क्रमांक २३,** सिटी आर्केड, प्लॉट क्रमांक ४ आणि ५ शिवाजी नगर, जेल रोड, वॉटर टँक समोर, नाशिक रोड दासक शिवार | रु ९,५०,००० /- | रु ९५,००० /- |

**इ लिलावाची तारीख :** १३/१२/२०२२ सकाळी ११. ०० ते दुपारी २. ००
**बोली वाढविण्याची किमान रक्कम :** रु १०,००० /- [रुपये दहा हजार मात्र ]
**बोली पत्र, सहभाग पत्र, / केवायसी कागदपत्रे / ईएमडी सादर केल्याचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ :** १२/१२/२०२२ संध्याकाळी ६. ००
**पाहणीची तारीख :** ०९/१२/२०२२ दुपारी १. ०० ते संध्याकाळी ४. ००
**ज्ञात असलेली देयता :** ज्ञात नाही

हे प्रकाशन ही कर्जदार / सहकर्जदार याना सिक्युरिटी इंटरेस्ट [इन्फोर्समेंट ] नियम २००२ चा नियम ८[६] अनुसार ३० दिवसांची सूचना आहे.
विक्री प्रक्रियेच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया संरक्षित धनको यांचे संकेतस्थळ **http://omkaraarc.com/auction.php.** पाहावे. बोलीदार **http://www.bankeauction.com** येथेही भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार **मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, दूरध्वनी :** - + ९१ - ७२९१९८११२४/ २५/ २६ **येथे तसेच हेल्प लाईन आयडी : support@bankeauctions.com येथे तसेच श्री हरीश गौडा, मोबाईल क्रमांक** ९५९४५ ९७५५५, **इ मेल आयडी hareesh.gowda@c1india.com** येथे संपर्क साधावा.

स्वाक्षरी / -
दिनांक : ०९-११-२०२२ — प्राधीकृत अधिकारी
स्थळ : मुंबई — ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
[ जे ओमकारा पीएस ०४/ २०२०- २१ ट्रस्ट यांचे ट्रस्टी म्हणून कार्यरत आहेत ]

CMYK